# केंद्रीय अर्थसंकल्प २०२२-२०२३ मधील ठळक वैशिष्ट्ये

-

केंद्रीय अर्थसंकल्पात सूक्ष्म आर्थिक स्तरावर सर्वसमावेशक कल्याणावर लक्ष केंद्रित करून स्थूल आर्थिक स्तरावरील वाढीवर भर देण्यात आला आहे. केंद्रीय वित्त आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्री निर्मला सीतारामन यांनी आज संसदेत २०२२-२०२३ वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला.

**अर्थसंकल्पातील महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत –**

## भाग अ

- भारताचा आर्थिक विकास दर 9.2 टक्के राहील असा अंदाज आहे, जो सर्व मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये सर्वाधिक आहे.
- 14 क्षेत्रांमध्ये उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजनेअंतर्गत 60 लाख नवीन रोजगार निर्माण होणार आहेत.
- उत्पादन संलग्न प्रोत्साहन -पीएलआय योजनेमध्ये 30 लाख कोटी रुपये मूल्याचे अतिरिक्त उत्पादन वाढविण्याची क्षमता आहे.
- पुढच्या 25 वर्षांत भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या 100 वर्षपूर्तीकडे वाटचाल करताना यंदाचा अर्थसंकल्प पुढील चार प्राधान्यक्रमांसह विकासाला चालना देणारा आहे:

the_thinking_treet3
THRIVING FOR SUSTAINABLE FUTURE

1. पीएम गतीशक्ती
2. समावेशक विकास
3. उत्पादकता वाढ आणि गुंतवणूक, उगवत्या संधी, ऊर्जा संक्रमण आणि हवामान संबंधी कृती.
4. गुंतवणुकीसाठी वित्तपुरवठा

## पीएम गतिशक्ती

- रस्ते, रेल्वे, विमानतळ, बंदरे, मालवाहतूक, जलमार्ग आणि लॉजिस्टिक इन्फ्रास्ट्रक्चर ही पीएम गतिशक्तीला चालना देणारी सात इंजिने आहेत.

## पीएम गतीशक्ति राष्ट्रीय बृहद आराखडा

- पीएम गतिशक्ती राष्ट्रीय बृहद आराखड्यामध्येआर्थिक परिवर्तन, अखंड बहुपर्यायी जोडणी आणि लॉजिस्टिक कार्यक्षमतेसाठी या सात इंजिनांचा समावेश असेल.
- नॅशनल इन्फ्रास्ट्रक्चर पाईपलाईनमधील या 7 इंजिनांशी संबंधित प्रकल्प पीएम गतिशक्ती आराखड्याशी संलग्न केले जातील.

### रस्ते वाहतूक

- 2022-23 या वर्षात राष्ट्रीय महामार्गांचे जाळे 25000 कि. मी. ने विस्तारले जाईल.
- राष्ट्रीय महामार्ग जाळ्याच्या विस्तारासाठी 20000 कोटी रुपये इतक्या निधीची तरतूद केली जाईल.

the_thinking_treet3
THRIVING FOR SUSTAINABLE FUTURE

### बहुपर्यायी लॉजिस्टिक पार्क्स

- 2022-23 या वर्षातचार ठिकाणी बहुपर्यायी लॉजिस्टिक पार्क्स उभारण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागिदारीच्या माध्यमातून कंत्राटे दिली जातील.

## <u>रेल्वेमार्ग</u>

- स्थानिक व्यवसाय आणि पुरवठा श्रृंखलांना मदत करण्यासाठी एक स्थानक- एक उत्पादन संकल्पना.
- 2022-23 या वर्षात जागतिक दर्जाचे स्वदेशी तंत्रज्ञान आणि क्षमतावृध्दी **कवच अंतर्गत रेल्वेमार्गाच्या जाळ्यात** 2000 **कि.मी.ची वाढ** केली जाईल.
- पुढच्या तीन वर्षांमध्ये 400 उत्कृष्ट वंदे भारत रेल्वेगाड्यांची निर्मितीकेली जाईल.
- पुढच्यातीन वर्षांमध्ये मल्टिमोडल लॉजिस्टिकसाठी 100 पीएमगतिशक्ती कार्गो टर्मिनल विकसित केले जातील.

## <u>पर्वतमाला</u>

- सार्वजनिक-खाजगी भागिदारीच्या माध्यमातून पर्वतमाला हा राष्ट्रीय रोपवे विकास कार्यक्रम हाती घेतला जाईल.
- 60 किमी लांबीच्या 8 रोपवे प्रकल्पांसाठी 2022-23 मध्ये कंत्राटे दिले जातील.

the_thinking_treet3
THRIVING FOR SUSTAINABLE FUTURE